# SUCCESS KEY TEST SERIES

**Unit Test- 3**

| | | |
|---|---|---|
| **Std: VIII (E.M)** | **Subject: Marathi** | **Time: 2Hrs** |
| **Date :** | **Chapter 8,9,10** | **Max Marks: 40** |

**विभाग १ : गद्य**

**Q.1 (क) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा:** **(8)**

प्र.. 1. आकृतीबंध पूर्ण करा. (2)




ईशान व त्याच्या साथीदारांना ती रात्र पहाडावर घालवावी लागली. त्यांनी आपल्याबरोबर नायलॉनचा तंबू आणला होता. त्या आधुनिक तंबूत त्यांची कोणतीही गैरसोय झाली नाही. पहाडावर झालेल्या या दुर्घटनेची माहिती सेनेला मिळाली होती आणि हवाईदलाच्या हेलिकॉप्टरने 'बचाव अभियान' सुरूही केले होते. सकाळ झाल्यावर ईशानने व त्याच्या मित्रांनी आसपासच्या जंगलातून लाकडे गोळा करून आणली व त्यांना आग लावली. त्या तून खूप धूर झाला. हा हवाईदलाच्या हेलिकॉप्टरसाठी एक संकेत होता. योगायोगाने एक हेलिकॉप्टर धूर पाहून खाली आले व पहाडाच्यावर घिरट्या घालू लागले. हवाईदलाच्या जवानांनी पहाडावर अडकलेल्या यात्रेकरू ना, ईशान व त्याच्या साथीदारांना पाहिले. ईशान व त्याच्या साथीदारांनी यात्रेकरूंना हेलिकॉप्टरपर्यंत पोहोचवायला हवाईदलाच्या जवानांना मदत केली. हवाईदलाच्या हेलिकॉप्टरने सर्वांना सुरक्षित ठिकाणी पोहोचवले होते. हवाईदलाच्या अधिकाऱ्यांना जेव्हा ईशान व त्याच्या साथीदारांचे बहादुरीचे कार्य समजले , तेव्हा त्यांनी सर्वांची प्रशंसा केली. एवढेच नव्हे , तर त्यांनी या मुलांना वीरपदक मिळावे म्हणून राष्ट्रपतींकडे शिफारस केली. तिकडे ईशान आणि त्याचे साथीदार पहाडावर झालेल्या दुर्घटनेनंतर सुरक्षित घरी पोहोचले , तेव्हा ते फार खूश झाले होते. गिर्यारोहणाचा हा अनुभव त्यांच्यासाठी कायम स्मरणात राहणारा होता.

प्र.. 2. उत्तरे द्या

अ. फक्त नावे लिहा (1)

1. हवाईदलातील अधिकाऱ्यांनी मुलांसाठी केलेली शिफारस -

2. हवाईदलातील हेलिकॉप्टरने सुरु केलेले अभियान –

आ. एका वाक्यात उत्तर लिहा (1)

ईशान व त्याच्या साथीदाराची गैरसोय का झाली नाही?

प्र.. 3. अ. अचूक शब्द ओळखून लिहा (1)

i. हेलीकॉप्टर, हेलिकॉप्टर, हेलिकॉपटर, हेलिकोपटर -

ii. गिर्यारोहण, गीर्यारोहण, गिरयारोहण -

आ. खालील वाक्यांचा काळ ओळखा. (1)

i. त्या आधुनिक तंबूत त्यांची कोणतीही गैरसोय झाली नाही

ii. गिर्यारोहणाचा हा अनुभव त्यांच्यासाठी कायम स्मरणात राहील

प्र.. 4. ईशान व त्याच्या मित्रांनी यात्रेकारुना केलेली मदत तुमच्या शब्दात लिहा. (2)

## विभाग २ : पद्य

**Q.2 खालील पदयाच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (8)**

प्र. 1. खालील आकृतिबंध पूर्ण करा. (2)




वाटते सानुली मंद झुळूक मी व्हावे
घेईल ओढ मन तिकडे स्वैर झुकावे

कधी बाजारी कधी नदीच्या काठी
राईत कधी वा पडक्या वाड्यापाठी
हळु थबकत जावे कधी कानोसा घेत
कधी रमत गमत वा कधी भरारी थेट

लावून अंगुली कलिकेला हळुवार
ती फुलून बघे तो व्हावे पार पसार
परि जाता जाता सुगंध संगे न्यावा
तो दिशादिशांतुनी फिरता उधळुनी द्यावा

गाण्याची चुकलीमुकली गोड लकेर
झुळझुळ झऱ्याची पसरावी चौफेर

शेतात पाचुच्या , निळ्या नदीवर शांत
खुलवीत मखमली तरंग जावे गात

वेळूच्या कुंजी वाजवुनी अलगूज
कणसांच्या कानी सांगावे हि तगूज
शिंपावी डोही फुले बकुळीची सारी
गाळुनी जांभळे पिकली भुळभुळ तीरी

दिनभरी राबुनी दमला दिसता कोणी
टवटवी मुखावर आणावी बि लगोनी
स्वच्छंद अशा या करुनी नाना मौजा
घ्यावया विसावा यावे मी तिन्हीसांजा

प्र. २. अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा (1)

क). झुळकेला स्वैर झुकावे वाटते, कारण

(१) तिला स्वातंत्र्य हवे असते.
(२) तिला सर्वत्र हिंडायचे असते.
(३) तिचे मन तिकडे ओढ घेते.
(४) ति ला लोक आमंत्रण देतात.

ख) वेळूच्या वनात अलगूज वाजते, कारण

(१) झुळूक स्वत:च गाणे गाते.
(२) तिथे गुराखी अलगूज वाजवतो.
(३) तिथे ध्वनिफित लावलेली असते.
(४) झुळकेच्या स्पर्शामुळे वेळूतून अलगूजाचा आवाज निघतो.

आ) एका वाक्यात उत्तरे लिहा (2)

i. झुळूक कोणाच्या मुखावर टवटवी आणणार आहे?
ii. झुळूक सुगंध घेऊन केव्हा पसार होणार आहे?

प्र. 3. ‘झुळूकेची परोपकारी वृत्ती’ तुमच्या शब्दात स्पष्ट करा. (2)

प्र. 4. तुम्ही झुळूक झालात तर काय कराल? (2)

## विभाग ३ : व्याकरण

**Q.3 (क) वाक्याचे प्रकार ओळखा** **2**

(i) मुंबईच्या परळ भागात जनावरांच इस्पितळ आहे.

(ii) माझी तब्येत जेव्हा चांगली होईल तेव्हा मी शाळेत जाईल.

**(ख) विरुद्धार्थी शब्द लिहा** **2**

(i) राग

(ii) चांगला

**(ग) खालील वाक्यातील योग्य ठिकाणी विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा.** **2**

(i) मुलांनो तुम्ही आपले काम करा.

(ii) इस्पितळ बघण्यासाठी मी आले आहे असं मी त्या साहेबांना सांगते

**(घ) पुढील शब्द्समूहासाठी इंग्रजी प्रतिशब्द लिहा** **3**

(i) भिक्षा मागणारा

(ii) दानधर्म करणारा

(iii) आईवडील नसणारा

## विभाग ४ : उपयोजित लेखन

**Q.4 (i) खालील जाहिरात वाचा आणि एका विषयावर पत्रलेखन करा.** **5**

गोदावरी कन्या विद्यालय, अहमदनगर येथे
स्वातंत्रदिनाच्या कार्यक्रमास प्रमुख अतिथि
व ग्रंथालयाच्या उद्घाटनासाठी
मा.महापौर श्री.विजयपाटील यांना




**(ii) पुढील उतारा वाचून त्यावर पाच प्रश्न तयार करा:** **5**

वृक्षांची महती आपल्या भारतात प्राचीन काळापासून सांगीतली गेली आहे. तुकाराम महाराजांना तर वृक्ष हे आपले सगेसोयरे वाटतात. असे हे वृक्ष आज या आधुनिक विज्ञानयुगातही- आपले जिवलग मित्र आहेत.विज्ञानामुळे माणसाने खूप प्रगती केली पण या विकासासाठी माणसाने अविचाराने जंगलतोड केली. आपण आपल्या या वृक्षमित्राचा घात केल्याने स्वत:वरच दुष्काळाचे, प्रदूषणाचे संकट ओढवून घेत आहोत, याचा माणसाला विसर पडलेला आहे. वृक्ष ही निसर्गाची फुप्फुसे आहेत. हवेतील कार्बन डायऑक्साइड शोषून घेतात आणि 'प्राणवायू' हवेत सोडून हवा शुद्ध करण्याचे काम करतात. यामुळे माणसाचे जगणे सुकर व सुखी झाले आहे.

**(iii) पुढील विषयावर निबंध लिहा:** **5**

माझा गिर्यारोहणाचा पहिला अनुभव

**-------- All the Best --------**